# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.10.2025** **वारःरविवार**

---

1. जीएसटीचे लाभ अंतिम ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 54 उत्पादनांच्या किंमतींवर अर्थमंत्रालयाचं लक्ष
2. ब्रह्मोस क्षेपणास्त्र वाढत्या स्वदेशी संरक्षण क्षमतेचं प्रतीक असल्याचं संरक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन
3. औषधनिर्माण आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रात नेफिथ्रोमायसिन स्वदेशी प्रतिजैविकामुळे आत्मनिर्भरतेचा टप्पा साध्य
4. कर्तव्यपथावर काल दीपोत्सव तर आज अयोध्येत शरयूतीराव 26 लाख दीप उजळणार
5. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान दरम्यान तत्काळ युद्धबंदीवर सहमती आणि
6. क्रिकेटमध्ये आज पुरूष आणि महिला संघांचे सामने

**<u>निर्मला सितारामन- जीएसटी</u>**

सुधारित वस्तू आणि सेवा कराचे संपूर्ण लाभ अंतिम ग्राहकापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने, 54 उत्पादनांच्या किंमतीवर अर्थ मंत्रालय लक्ष ठेवून असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामान यांनी म्हटलं आहे. या सर्व उत्पादनांवर सुधारित जीएसटी लागू झाला असल्याचंही त्या म्हणाल्या. दिल्लीत काल झालेल्या जीएसटी बचत उत्सवासंदर्भात आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. नव्या जीएसटीची अंमलबजावणी ही केंद्र सरकार आणि जीएसटी परिषद यांच्यातील सहकार्याचं प्रतिबिंब असून, सामान्य नागरिकांना त्याचे अधिकाधिक फायदे मिळतील असंही त्या म्हणाल्या. दर कपात, प्रक्रिया सुलभीकरण, जीएसटीचे दोनच टप्पे ठेवणे, तसंच वर्गीकरणासंबंधीच्या समस्या सोडवणे या गोष्टी मुदतीपूर्वी पूर्ण झाल्या असून, या सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे, इलेक्ट्रॉनिक्स, वाहन उद्योग आणि ग्राहकोपयोगी वस्तू या प्रमुख क्षेत्रांमध्ये विक्रमी विक्री झाल्याचंही त्यांनी सांगितलं. यावेळी बोलताना, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवरात्रीच्या काळात वाहन विक्रीत वृद्धी नोंदवण्यात आली तर इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातही पुर्वीपेक्षा 25 टक्के वाढ झाली असल्याचं नमूद केलं. सध्याच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत देशाच्या विकासाचा वेग भक्कम झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विकासाचा अंदाज साडेसहा टक्क्यांपर्यंत वाढवला आहे.

**<u>सीतारामन-कर्नाटक</u>**

दरम्यान, शेतीचं उत्पन्न वाढवण्यासाठी, शेतकऱ्यांना सरकार सर्वतोपरी मदत करेल असं आश्वासन अर्थमंत्री सीतारामन यांनी शेतकऱ्यांना दिलं. कर्नाटकमधील रायचूर जिल्ह्यात जवळगेरा गावातल्या शेतकरी प्रशिक्षण आणि सामान्य सुविधा केंद्राचं उद्घाटन निर्मला सीतारामन यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. केंद्र सरकारच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसह मृदा आरोग्य कार्ड तसंच खत पुरवठा करण्यात आला आहे. तसंच डाळी आणि विविध धान्ये यांच्या किमान आधारभूत किंमतीतही वाढ करण्यात आल्याचं सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**<u>राजनाथ सिंह-ब्रह्मोस</u>**

ब्रह्मोस केवळ क्षेपणास्त्र नसून भारताच्या वाढत्या स्वदेशी संरक्षण क्षमतेचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल लखनौ इथं केलं. संरक्षणमंत्री आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते काल लखनौ इथं ब्रह्मोस एरोस्पेस युनिटमध्ये तयार केलेल्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रांच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी सिंग बोलत होते. वेग, अचूकता, आणि ताकद यांच्या संयोगामुळे ब्रह्मोस जगातील सर्वोत्तम प्रणालींपैकी ब्रह्मोस एक असून, राष्ट्राचे शत्रू आता फार काळ ब्रह्मोसपासून सुटून जाऊ शकणार नाहीत. पारंपरिक युद्धक्षमता, प्रगत मार्गदर्शित प्रणाली असलेले ब्रह्मोस सुपरसॉनिक वेगाने दीर्घ अंतरावर मारा करू शकते. देश आपली सुरक्षा भक्कम करत आहेच शिवाय तो अशा टप्प्यावर

उभा आहे की संरक्षण आणि तंत्रज्ञानातील विश्वासार्ह भागीदार असल्याचं जगाला दाखवून देतो आहे. ब्रह्मोसच्या कामगिरीने मेक इन इंडिया ही केवळ घोषणा न राहता जागतिक ओळख बनला आहे. गेल्या महिन्यात ब्रह्मोस चमूने दोन देशांसमवेत अंदाजे चार हजार कोटी रुपयांचे करार केले असल्याची माहितीही सिंग यांनी यावेळी दिली.

**<u>नाफिथ्रोमायसिन</u>**

देशाच्या औषधनिर्माण आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या प्रयत्नातील एक महत्त्वाचा टप्पा, नेफिथ्रोमायसिन या पहिल्या प्रतिजैविकाच्या विकासाने साध्य केला असल्याचं प्रतिपादन केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी काल दिल्लीत केलं. तीन दिवसांच्या वैद्यकीय कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर केल्यानंतर ते बोलत होते. हे प्रतिजैविक औषध श्वसन संसर्गावर प्रभावी असून, कर्करोगाच्या रुग्णांसाठी आणि नियंत्रित मधुमेही रूग्णांसाठी फायदेशीर असल्याचं ते म्हणाले. त्याचबरोबर जैवतंत्रज्ञान विभागाच्या सहकार्यानं हिमोफिलियाच्या उपचारांमध्ये जीन उपचार पद्धतीसाठी स्वदेशी चाचणी यशस्वी झाल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. तामिळनाडूच्या वेल्लोर इथल्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ही यशस्वी चाचणी झाली असून यामुळे रक्तस्राव न होता 60 ते 70 टक्के सुधारणा दर नोंदवल्याचे निष्कर्ष न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसीनमध्ये प्रकाशित झाल्याचं ते म्हणाले. भारतानं दहा हजारहून अधिक मानवी जीनोम अनुक्रमित केले असून येत्या काही वर्षांत ही संख्या दहा लाखांपर्यंत वाढवण्याचा उद्देश आहे.

**<u>दिल्ली-दीपोत्सव</u>**

दिवाळीचा काल दुसरा धनत्रयोदशीचा दिवस. दिल्लीत काल अयोध्येच्या धर्तीवर पहिल्यांदाच कर्तव्य पथावर दीपोत्सव साजरा करण्यात आला. दीपोत्सव हा केवळ दिव्यांचा उत्सव नसून ती एक नवी पहाट असल्याचं दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या. श्रद्धा आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम दर्शवणारी एक नवकथा निर्माण होत असल्याचं त्या म्हणाल्या. यावेळी जवळपास दीड लाखांहून अधिक दिवे उजळण्यात आले तर हजारो ड्रोनच्या माध्यमातून रामायण कथा साकारण्यात आल्या.

**<u>अयोध्या-दीपोत्सव</u>**

उत्तर प्रदेश सरकारच्या वतीनं आज शरयूतीरी दीपोत्सव साजरा करण्यात येत आहे. 26 लाख 11 हजार आणि 101 दिवे उजळून नवा विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न यामधून केला जाणार आहे. शरयूतीरावरील 56 घाटांवर, 33 हजार स्वयंसेवकांकडून एकंदर 28 लाख पणत्या प्रज्वलित केल्या जाणार आहे. यंदाच्या वर्षी एकवीसशे वेदाचार्य लक्ष्मण किला घाट ते नया घाटपर्यंत भव्य आरती करून विश्वविक्रम प्रस्थापित करणार आहेत. तसंच अकराशे स्वदेशी ड्रोन अयोध्येचे आकाश रामायण दृश्यांनी भरून टाकतील. होलोग्राफिक लेसर शोमुळे उपस्थितांना आगळेवेगळे दृश्य पाहायला मिळणार आहे.

**<u>अफगाण-पाक युद्धबंदी</u>**

अफगाणिस्तान आणि पाकिस्तान दरम्यान गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या सीमासंघर्षाच्या पार्श्वभुमीवर उभय देशांनी तत्काळ युद्धबंदीवर सहमती दर्शवली आहे. कतारच्या परराष्ट्र मंत्र्यांनी काल ही घोषणा केली. कतारची राजधानी दोहा इथं, कतार आणि तुर्किएच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेत दोन्ही देशांदरम्यान हा करार करण्यात आला. या वाटाघाटींदरम्यान तत्काळ युद्धबंदी आणि दोन्ही देशांदरम्यान कायमस्वरूपी शांतता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी पाठपुरावा बैठका घेण्यावर सहमती दर्शवण्यात आली असल्याचं कतारच्या परराष्ट्र मंत्रालयानं प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनात म्हटलं आहेत. पाकिस्तानी शिष्टमंडळात संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ आणि गुप्तचर प्रमुख जनरल असीम मलिक यांचा समावेश होता तर अफगाणिस्तानचे प्रतिनिधित्व संरक्षण मंत्री मोहम्मद याकूब यांनी केले.

**<u>अमेरिका-निदर्शन</u>**

अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्या कारभार आणि धोरणांचा निषेध करण्यासाठी देशाच्या विविध भागातले नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. अटलांटा, लॉस एंजेलिस, न्यूयॉर्क इथं मोठ्या प्रमाणात निदर्शनं करण्यात आली. ट्रंप यांच्या हुकुमशाही कारभारामुळे अमेरिकी लोकशाही धोक्यात आली असल्याचं निदर्शकांचं म्हणणं आहे. स्थलांतरीतांविरुद्ध उगारलेला

बडगा, आरोग्यसेवेच्या तरतुदीत कपात आणि रस्त्यांवर सुरक्षा दलांची नेमणूक ह्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. ट्रंप विरोधी नेत्यांनी मात्र नागरिकांना शांततापूर्ण निदर्शनं करण्याचं आवाहन केलं आहे.

**<u>रेल्वे</u>**

रेल्वेच्या कामकाजाशी संबंधित दिशाभूल करणारे व्हिडिओ सामायिक करणाऱ्या सोशल मीडिया हँडल्सवर भारतीय रेल्वेनं कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. सणासुदीच्या काळात काही सोशल मीडिया हँडल्स जुने किंवा दिशाभूल करणारे व्हिडिओ प्रसारित करत असल्यानं प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला असल्याचं रेल्वे मंत्रालयानं एका निवेदनात म्हटले आहे. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, अशा 20 हून अधिक सोशल मीडिया हँडल्सची ओळख पटवली आहे. रेल्वे प्रशासनानं या हँडल्सविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. प्रवाशांना रेल्वेच्या अधिकृत सूचना आणि मंत्रालयाच्या सोशल मीडिया हँडल्सवरच अवलंबून राहण्याचं आवाहनही मंत्रालयानं केलं आहे.

**<u>हॉकी</u>**

मलेशियामध्ये सुरू असलेल्या सुलतान जोहर चषक हॉकी स्पर्धेत भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. भारताला ऑस्ट्रेलियानं 2-1 नमवून स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं.

**<u>बँडमिंटन</u>**

गुवाहाटी इथं सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या एकेरीच्या अंतिम सामन्यात भारताची तन्वी शर्मा आज थायलंडच्या दुसऱ्या मानांकित खेळाडूसोबत सामना करणार आहे. 16 वर्षीय तन्वीने काल चीनच्या खेळाडूवर विजय मिळवत अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी तन्वी केवळ पाचवी भारतीय बॅडमिंटनपटू ठरली.

**<u>क्रिकेट</u>**

पर्थ इथं भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान पुरुषांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील मर्यादित षटकांचा पहिला सामना आज होणार असून या दौऱ्यात पन्नास षटकांच्या 3 सामन्यांचा समावेश आहे. त्यानंतर 20 षटकांच्या 5 सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना सकाळी 9 वाजता सुरू होईल. तर महिलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील भारत विरुद्ध इंग्लंड हा सामना आज इंदूर इथं दुपारी तीन वाजता होणार आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.